नि.फौज केस क्र. २०३/२०२३

निशाणी क्र. २१

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०१ यांची जबानी.**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –

माझे नांव – हेमंत रामचंद्र मुक्कलवार

वय सुमारे – २७ वर्षे, व्यवसाय – मजूरी

राहणार – सैलानी, – ता. बुलडाणा

जिल्हा – बुलडाणा

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री. मो. बशीर मो. नसीर यांचेकडून</u>**

मी सैलानी येथे २७ ते २८ वर्षांपासून राहतो. मी सर्व आरोपींना ओळखतो. आरोपी हे माझे घराशेजारी राहतात. घटना ही दि. १५.०६.२०२३ रोजी दुपारी ०३.०० वाजेच्या नंतर माझे घरासमोर घडली. माझी पत्नी धुणे-भांडे करुन घरात गेली. त्यावेळेस मी दर्गा परीसरात असतांना मला माझे पतनीचा फोन आला आणि तिने मला सांगीतले की, आरोपी निर्मला, लक्ष्मी आणि हे आपल्या घरी येवून मला मारहाण करत आहे, तुम्ही लगेच या असे म्हटले. तसेच आरोपी हनुमंता आणि सुनील हे तुमच्या वडीलांना पकडून शिविगाळ करुन मारहाण करत आहेत. त्यानंतर मी घरी आलो.

०२ आरोपी निर्मला आणि लक्ष्मी हे माझे आईला आणि पत्नीला हाता बुक्यांनी मारहाण करत होते. आरोपी सुनील आणि हनुमंता माझे वडीलांना हाता बुक्यांनी मारहाण करत होते. त्यानंतर मी त्यांना सोडविण्याचा प्रयत्न केला असताव आरोपी सुनील याने मला पकडला आणि हनुमंता याने माझे डोक्यावर दगडाने मारहाण केली. त्यामुळे माझे डोक्यातून रक्त वाहू लागले व मला जखम झाली. मला हनुमंता व सुनील यांनी धमकी दिली पुन्हा आमच्या नादी लागला तर तुला जीवे मारुन टाकू. त्यानंतर रवी जाधव, राजु सुरेशे, अजहर कुरेशी व

राजु भोंड यांनी आमचे भांडण सोडविले. त्यानंतर मी रायपूर पोलिस स्टेशन येथे गेलो. त्यानंतर त्यांनी आम्हाला उपचारासाठी रायपूर येथील सरकारी दवाखान्यात पाठविले तेथून त्यांनी मला बुलडाणा येथील सरकारी दवाखान्यात उपचारासाठी पाठविले.

०३. मी बुलडाणा येथील सरकारी दवाखान्यात ३ दिवस भरती होतो. तेथे माझे सी टी स्कॅन झाले. त्यानंतर मला सुट्टी झाली. तरी मला बरे वाटत नव्हते म्हणून मी डॉक्टरांना मला भरती ठेवण्याची विनंती केली परंतु त्यांनी मला सुट्टी दिली. त्यानंतर दि. २३.०७.२०२३ रोजी मी पोलिस स्टेशन रायपूर येथे जावून आरोपी विरुद्ध तक्रार दिली. आता मला अभिलेखावरील मी दिलेली फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. तयातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. २२** देण्यात येत आहे. आता मला अभिलेखावरील एफ आय आर दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. तयातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. २३** देण्यात येत आहे. मला आरोपी हनुमंता याने ज्या दगडाने डोक्यावर मारले तो दगड मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला ओपी नं १७/२०२५ दाखविण्यात आला. आरोपीने मला ज्या दगडाने मारले तो हाच दगड आहे. त्यास मटेरीअल **ऑब्जेक्ट १** देण्यात येत आहे. आज आरोपी निर्मला, लच्मी बाई, सुनील न्यायालयात हजर आहेत.

**आरोपीचे विधिज्ञ श्री. शेख जुबेर यांचे विनंती वरुन**
**उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकुब**

श्रवणोत्तर स्विकृत,

SMITA HARIDAS UKEY
Digitally signed by SMITA HARIDAS UKEY
Date: 2025.08.26 17:47:34 +0530

( श्रीमती एस. एच. उके )

दि. २६.०८.२०२५

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिखली